**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४,२२६९४९८५, Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com

**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र./ल. ले/ 217 /सन २०१८-१९
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: ०१/०२/२०१९.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
४. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
५. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी.
६. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली /मिरा-भाईंदर /वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल /भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
९. पोलीस अधिक्षक,ठाणे(ग्रामीण) रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
११. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी.
१२. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी.
१३. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी.
१४. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी.
१५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१६. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी
१७. नवी मुंबई एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१८. बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१९. वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी
२०. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२१. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

संदर्भ :- शासन निर्णय क्र. एस-३०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३,दि. १६ ऑक्टोबर, २०१८.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **दुसरी** बैठक **शुक्रवार,** दिनांक **२८/१२/२०१८** रोजी **सकाळी ११.००** वाजता जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, फोर्ट मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## Minutes of 2nd meeting of State Mangrove Protection Monitoring Committee held on 28th December 2018

The Chairman welcomed all the members to the meeting and initiated discussion on the action taken regarding the minutes of meeting held on 12th November 2018. Mr.Debi Goenka suggested additions to the minutes of first meeting. The Committee discussed the points raised by Mr.Debi Goenka and decided to add the following points.

1. Regarding the issue of installing GPS trackers in all vehicles disposing of garbage and solid wastes the BMC will ensure feasibility, ensure compliance within 6 months and submit a report to the committee.
2. Permissions/leases for aquaculture ponds on mangrove areas would not be renewed.
3. CIDCO should ensure that the water flows to the mangroves in Panje Wetlands are not blocked and appropriate action shall be initiated if the water flows are blocked.

**Item no. 1**

Constitution of Sub Committee at District and Taluka Level.

It was informed by all the Collectors that the sub committees at District and Taluka Level have been constituted. The Committee directed to put the constitution of the committee and contact details and email ids of all the members for display in the offices of Tehsildars, SDOs and Collectors.

**Item no. 2**

To set up Grievance Redressal Mechanism.

It was informed by the member secretary that separate website has been created for redressal mechanism. Toll free number 1926 is also working for mangrove destruction complaints.

During discussions it was noticed and the complaint number is not provided to the complainant who complains at the 1926 number and that toll free number was not working for few days. The committee directed to include separate option for mangroves and wetland destruction in 1926 call centre.

It was decided by the committee that all complainants should be kept informed of the status of the action being taken on their complaints and complaint number should be allotted to the complaints to enable them to follow up.

**Item no. 3**

Publicity regarding the availability of Grievance Redressal Mechanism.

It was informed to the committee that the availability of Grievance Redressal Mechanism has been publicized through News Papers, Facebook, and other social media.

**Item no. 4**

Restoration of Mangroves.

The Divisional Commissioner asked all the District Collectors and Forest Department regarding restoration of mangroves undertaken at the destructed areas. It was informed that restoration works in destructed mangrove areas is not yet initiated. Collectors and Forest Department were requested to submit a list of locations where restoration is required to be carried out and a time bound program should be submitted to the committee.

**Item no. 5**

During discussion it was noticed that most of the complaints received by the committee are about dumping of debris or illegal construction in 50miter buffer zone of mangroves. The forest department shall take action regarding destruction of mangroves in notified mangrove areas. The Revenue Department, Police and MPCB will take action in non notified mangrove areas and the buffer zone. The MRSAC map of 2005 should be used for comparing area of mangroves at site. The planning authorities should consider violation before regularzing any areas for further development. The Forest Department shall assist the planning authorites for identifying the

**Item no. 6**

Transfer of Government Mangrove Land to Forest Department and Consequential making revenue entries.

It was noticed that the mangrove areas within jurisdiction of Mira Bhayander Municipal Corporation are not yet notified and transferred to Forest Department.It was decided that the corporation should take immediate steps to notify these areas and transfer to Forest Department.

**Item no. 7**

Nomination of Nodal officers to the Committee.

It was observed that no representatives from MCZMA, MCGM, MPCB and Navi Mumbai Municipal Corporation were present for the meeting. The Divisional Commissioner showed his displeasure on such attitude by the authorities. He further directed to inform to all the authorities who were absent for the meeting and this issue may be brought to the notice of Hon'ble Court if the member remain absent for the meeting

**Item no. 8**

Mangrove mortality due to Kharland bunds.

It was pointed out that Kharland bunds constructed within mangrove areas needs to be removed and areas needs to be restored. The Divisional Commissioner requested to submit list of specific Kharland bunds which are constructed in mangrove areas and causing destruction to the mangroves.

**Item no. 9**

To notify all government mangrove land into Reserve Forest.

The Divisional Commissioner directed that notifying all the government mangrove land should be finished by May 2019, and the notified mangrove areas should be transferred to Forest Department. He further directed that all the notifications should be made available on the website of the Committee as and when they are published.

The committee discussed and reviewed the action taken against the complaints received and details are as below.

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र पाटील :- Destructioin of mangroves due to slum encroachment and debris is dumping at mangroves behind Neminath Heights Bldg, Gaurav city, near Mayor Bungalow, Mira road east. | • या तक्रारी संदर्भात समितीच्या अध्यक्षांनी मिराभाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना विचारणा केली असता त्यानी अद्याप सदर जागेची स्थळ पहाणी झालेली नाही असे सांगितले.<br>• समितीचे नर्देशाप्रमाणे कांदळवनाच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर ४८ तासाच्या आत कार्यवाही होणे अपेक्षित आहे.<br>• निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे यांनी या तक्रारीबाबत स्थळ पहाणी झाली नसून तहसिलदार ठाणे यांना स्थळ पहाणी साठी सांगण्यात आले आहे असे सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत या तक्रारीशी संबंधीत नोडल अधिकाऱ्यांना सदर जागेची स्थळ पहाणी तात्काळ करण्यास व योग्य ती कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>२. जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे.<br>३. नोडल अधिकारी,ठाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. अनर्जित चव्हाण :-<br>deemed permissions for killing of mangroves by NMMC | • श्री.अनर्जित चव्हाण यांनी सेक्टर १९ नवी मुंबई येथे कांदळवनापासून जवळजवळ २ कि.मीची भिंत बांधण्याचे प्रस्ताव कोणत्याही प्रस्तावाशिवाय मंजूर केले गेले आहे, सीआरझेडकडून कोणत्याही परवानग्या न घेता कायद्याचे उल्लंघन केले गेले आहे अशी तक्रार केली आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने नवी मुंबई महानगरपालिकेला सक्षम प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय कोणतेही काम करु नये असे निर्देश देऊन सदरची तक्रार बंद करण्याच्या सूचना दिले. | १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.<br>२. जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे. |
| ३ | श्री. झोरु भाथेना :- जूहू तारा कोळी जमात<br>Complaint reg the destruction of Juhu Koliwada Beach (CRZ-1/NDZ/Mangrove Forest) & Cutting of Mangorve | • या तक्रारीबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी या तक्रारीबाबत उपवनसंरक्षक यांचा स्थळ पाहणी अहवाल MCZMA यांना सादर करण्यात आला असून मा. उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल झाली असून त्याची पुढील सुनावणी दि. १७ जानेवारी २०१९ रोजी असल्याचे सांगितले.<br>• मा. उच्च न्यायालयाने कांदळवन कक्षास प्रकल्प स्थळाची पाहणी करुन अहवाल सादर करणेचे निर्देश दिले आहेत.<br>• याबाबतचा समितीने अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>२. कांदळवन कक्ष |
| ४ | दि ब्लू<br>Wetland and Mangrove Destruction in Mira road | • या तक्रारीबाबत मिरा-भाईंदर यांच्या प्रतिनिधींनी सदर जागा ही उल्हासनगर येथील जाफरी खाडी आहे तेथे स्थळ पहाणी झाली असून तेथे माती भराव झालेला नाही आणि कोठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे सांगितले.<br>• समितीने सर्व सदस्यांना स्थळ पहाणी करताना शक्य असल्यास तक्रारदारासोबत पाहणी करावी जेणेकरुन तक्रारीचे निवारण लवकरात लवकर करता येईल.<br>• तसेच समितीने या तक्रारीबाबत नोडल अधिकारी यांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | १. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे<br>२. जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे. |
| ५ | श्री.ल्यूक मेन्डेस :-<br>Pollution and Garbage dumping killing mangroves at Mahim east Mangrove close to the railway tracks | • या तक्रारी संदर्भात वनक्षेत्रपाल मध्य मुंबई यांनी सदर जागेवर तक्रारदारासोबत स्थळ पहाणी केली आहे असे सांगितले.<br>• सदर जागेवर कांदळवनाच्या नजिक रेल्वे रुळाजवळच पाईप लाईन असून सिमेटचे पाणी नाल्यातून येत आहे त्यामुळे कांदळवनाचा नाश होण्याची शक्यता आहे असे त्यांनी सांगितले.<br>• त्या नुसार समितीने या तक्रारीबाबत MPCB यांना कळवावे व ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | १. पोलीस आयुक्त, मुंबई<br>२. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,मुंबई.<br>३. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक.मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्रीमती श्वेता भट<br>Destruction of Mangroves at Pahadi Goregaon, Survey no. 161, CTS 1 | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेवर स्थळपाहणी झाली असून तेथे कांदळवनापासून ५० मिटर च्या आत विकसकाचे काम चालू होते त्यामुळे गुन्हा दाखल केलेला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत पुढील कार्यवाही तात्काळ करावी व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,मुंबई. |
| ७ | श्री. मंगेश गांधी<br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-1<br>Debris dumping in Gorai creek Mangroves | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेची स्थळ पहाणी झाली असून संबंधीतांवर गुन्हा दाखल केला आहे असे सागितले.<br>• तसेच समितीने ज्या ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले आहे तेथे योग्य ती कार्यवाही करुन तेथील जागेचे Restroration करण्याच्या सूचना दिल्या.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,मुंबई. |
| ८ | श्री. बी.एस. यादव<br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-2<br>Mangrove Destruction | • या तक्रारीबाबत उपजिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी अद्याप स्थळ पहाणी झालेली नाही व दोन दिवसाने स्थळ पाहणी होणार असलेचे सांगितले.<br>• समितीचे निर्देशाप्रमाणे कांदळवन तक्रारीबाबत २ दिवसात स्थळ पहाणी होणे आवश्यक आहे. या तक्रारीबाबत तात्काळ स्थळ पहाणी करुन या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,मुंबई. |
| ९ | श्री. जयेश गुप्ता<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe- Desai-Khardi Gaon, Thane. | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींनी ही जागा खाजगी असून तेथे कांदळवन नसल्याचे त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सॅटलाईट ईमेजेस नुसार तेथे आधी कांदळवन होते किंवा कसे याबाबत वन विभागाकडून खात्री करण्यास सांगितले व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या | १. जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>२. आयुक्त ठाणे महानगरपालिका |
| १० | श्री. शैलेश जोशी व इतर 9<br>Mangroves at Charcop | • श्री. शैलेश जोशी व इतर यांनी चारकोप येथील कांदळवनावर केलेला भराव व कचरा काढून स्वच्छ करण्याबाबत व तेथे भिंत बांधण्याबाबत विनंती केली आहे.<br>• त्यामुळे समितीने या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व कांदळवन कक्षाने सदर जागेची स्थळ पहाणी करुन कांदळवन स्वच्छतेबाबत आवश्यक कार्यवाही करुन कुंपण भिंतीचे काम प्रस्तावित करावे व अहवाल पुढील | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,मुंबई.<br>२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक.मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. सुमित पाटील<br>Destruction of Mangroves | • या तक्रारी संदर्भात निवासी उप जिल्हाधिकारी मुंबई यांनी दि. १७.१२.१०२८ रोजी सदर जागेवर स्थळ पहाणी झाली असून तेथे कांदळवनाचे कोठेही नुकसान झालेले नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांना सदर जागेवरील कांदळवनाचा ऱ्हास होवू नये यादृष्टीने योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करावा. | १. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| १२ | श्री. स्टॅलिन डी व श्री. लुक मेंन्डीस<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • या तक्रारी कांदळवन लागवड करण्याबाबत असल्याने समितीने निवासी उप जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना महानगरपालिके कडुन सदर जागेतील भराव काढून Restoration करुन घेण्याचे निर्देश दिले व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. |
| १३ | श्री. अमित शुक्ला<br>Debris on Water Body | • या तक्रारी संदर्भात समितीने तहसिलदार ठाणे यांनी अद्याप स्थळ पहाणी झालेली नाही असे त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने २ दिवसात स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सांगितले तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे |
| १४ | श्री. एश्ले लोबो<br>Mangroves being cut and house being build at Bandra | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तक्रार प्राप्त झालेली नाही असे सांगितले.<br>• त्यानुसार समितीने पुन्हा ही तक्रार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पाठविण्यास सांगितले व या बाबत तात्काळ कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मंबई उपनगर, मुंबई. |
| १५ | श्री. रेजी अब्राहम<br>Johny garage/ ICCU franchisee another illegal construction in the ever growing list of such illegal structures in Charkop Village | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी या पूर्वीच्या समितीच्या बैठकीमध्ये वारंवार चारकोप येथील तक्रारी येत होत्या यापूर्वी या तक्रारींवर कार्यवाही झालेली आहे परंतु आता नव्याने आलेल्या या तक्रारीबाबत स्थळ पहाणी झालेली नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ स्थळ पहाणी करुन त्या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना दिल्या. | जिल्हाधिकारी, मंबई उपनगर, मुंबई. |
| १६ | श्री. धिरज परब<br>मीरा भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम येथे सुभाषचंद्र बोस नावे कांदळवन, पाणथळ | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी ही जागा CRZ मध्ये आहे यापूर्वी त्या ठिकाणी भराव झालेला आहे. भराव करुन मैदान तयार करुन तेथे महापालिकतर्फे सामने भरवले जातात असे सांगितले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे जि. ठाणे.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक. ठाणे जि. |

| | | | |
|---|---|---|---|
| | व सीआरझेड बाधित क्षेत्राचा ऱ्हास चालवल्या बाबत | | ठाणे. |
| १७ | श्री.धिरज परब<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • परंतु त्या जागेवर कांदळवन आहे किंवा कसे या बाबत समितीने विचारणा केली असता त्यांनी सध्या त्या जागेवर कांदळवन नसल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने यापूर्वी या जागेवर कांदळवन होते किंवा कसे हे तपासण्यास सांगितले व त्या नुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले.<br>• मिरा-भाईंदर येथील कांदळवन तक्रारी मोठया प्रमाणात वाढत असून तेथे कांदळवन क्षेत्रात तोड होणे, अतिक्रमण तसेच भराव करणे अशा तक्रारी मोठया प्रमाणात प्राप्त होत असलेचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सांगितले. याबाबत चौकशी करणे व नियंत्रण ठेवण्यासाठी मिरा-भाईंदर येथील कांदळवनाच्या तक्रारीबाबत एक वेगळी उप समिती स्थापन करण्याबाबत सह अध्यक्षांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर येथील तक्रारींबाबत एक महिन्यात एक उप समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले व त्या उप समितीतील सदस्यांना स्थळ पहाणी करण्यास आणि मिरा-भाईंदर येथे होणारा सर्व कांदळवनाच्या तक्रारींवर योग्य ती कार्यवाही करण्यास सांगितले.<br>• मीरा-भाईंदर महापालिकेने त्यांचेकडील कांदळवन क्षेत्र अधिसूचित करणेची कार्यवाही अद्याप केलेली नाही. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ती कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी. | ३. मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| १८ | उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-3<br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर स्थळ पहाणी झाली व त्यामध्ये कांदळवनाचे नुकसान झालेचे निदर्शनास आले असून FIR दाखल झाली आहे असे सागितले.<br>• त्या नुसार समितीने संबंधीतांवर कार्यवाही करण्याच्या व सदर जागेवर पुन्हा कांदळवनाची लागवड करण्याच्या व या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| १९ | श्री. सुनिल अगरवाल<br>Major fire in Mangroves at Nerul | • या तक्रारीबाबत सदस्य सचिवांनी सदर जागेवरील १ ते २ गुंठे जागेवर गवत जाळले होते ते विझविण्यात आले आहे तेथे कांदळवनात कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही असे सांगितले.<br>• समितीने ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | सहाय्यक वनसंरक्षक, मुंबइ कांदळवन संधारण घटक, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>Mangrove destruction across Uran-1 | • या तक्रारीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी आणि सिडको यांनी स्थळ पहाणी केली असून तेथे सलायन वॉटर जे कांदळवनात येत होते ते बंद झाल्यामुळे कांदळवनाचे नुकसान होत आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना याबाबत National Highway authority ला काम करताना कांदळवनास कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही यांची दक्षता घेणेबाबत कळविणेचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगड<br><br>२. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई. |
| २१ | श्री. बी.एन. कुमार व श्री. पवार<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • ही तक्रार पाणथळ क्षेत्रात भराव होत असलेबाबत आहे त्याची तात्काळ चौकशी करण्यास सांगितले व पाणथळावर भराव होत असल्यास तेथील काम थांबविण्याच्या सूचना समितीने जिल्हाधिकारी रायगड आणि सिडको यांना दिल्या.<br>• तसेच ही तक्रार पाणथळ संबंधी असल्याने Wetland authority यांना या तक्रारीबाबत अहवाल पाठविण्यास सांगितले.<br>• प्रस्तुत तक्रारीची तात्काळ चौकशी व आवश्यक कार्यवाही करुन समितीस अहवाल सादर करणेचे निर्देश देणेत आले. | १.जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगड<br>२.व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई. |
| २२ | श्री. बी.एन. कुमार व श्री. पवार<br>Mangrove destruction across Uran-2 | | |
| २३ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>Mangrove destruction across Uran-3 | | |
| २४ | श्री. दिपक कामथ<br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तहसिलदार यांनी सदर जागेची स्थळ पहाणी झालेली आहे असे सांगितले. तसेच तेथे कांदळवन नसल्याचे त्यांनी सांगितले.<br>• तसेच वन विभागामार्फत वनक्षेत्रपाल मध्य मुंबई यांनी केलेल्या स्थळ पहाणीनुसार Buffer Zone मध्ये काम चालू असल्याचे दिसून येत असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २५ | अज्ञात व्यक्ती<br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-6<br>Destruction of Mangroves. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी स्थळ पाहणी झालेली नाही असे सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत तात्काळ स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २६ | श्री. विनोद पुन्शी<br>Dumping of Debris on DPS Road within 50 meters of mangroves. Sector - 52, Nerul, Navi Mumbai, | • या तक्रारीबाबत समितीने सिडको यांना योग्य ती कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• नवी मुंबई महापालिकेने सदर क्षेत्राचे Restoration बाबत आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करावा. | १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.<br>२. सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | श्री. डेबी गोएंका<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी INS हमला येथे कांदळवनापासून ५० मिटरच्या आत भराव करुन खेळाचे मैदान तयार केल्यामुळे २०१६ मध्ये त्यांच्या Contractor वर FIR दाखल केला आहे असे त्यांनी सांगितले.<br>• तसेच पोलीसांमार्फत तपास चालू असून नव्याने Chargsheet दाखल करणेची कार्यवाही चालू असलेचे सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत पोलीसांनी तपास तात्काळ पुर्ण करुन Chargsheet दाखल करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २८ | अज्ञात व्यक्ती<br>Mangrove Destruction | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना विचारणा केली असता, त्यांनी तक्रार प्राप्त न झाल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने पुन्हा तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांना पाठविण्याबाबत सदस्य सचिवांना सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड |
| २९ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • या तक्रारीबाबत उपस्थित पोलीस विभागाचे प्रतिनिधींनी या तक्रारीबाबत गुन्हा दाखल झाला असून आरोपीस जामीन झालेला आहे असे सांगितले.<br>• समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर जागंचे मुंबई महानगरपालिकेकडून restroration करुन घेण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. पोलीस उप आयुक्त (अभियान) बृहन्मुंबई.<br>३. महापालिका |
| ३० | श्री. विनोद पुन्शी<br>Effluents released in mangroves raise a stink- T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • सदर तक्रारी संदर्भात अद्याप चौकशी झाली नसलेचे जिल्हाधिकारी यांच्या प्रतिनिधींने सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत नोडल अधिकारी यांनी MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ३१ | श्री. विनोद पुन्शी<br>Debris dumped during cleanup op-T. O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018. | • ही तक्रार कांदळवनाच्या ऱ्हासाची नसून भराव काढून स्वच्छ करण्याबाबतची असल्यामुळे समितीने आवश्यक कार्यवाही करुन ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको |
| ३२ | श्री. प्रसाद खाले<br>Destruction of Mangroves at Sagarmatha Club building, Colaba. | • सागरमाथा क्लब, कुलाबा येथील कांदळवन ऱ्हासाचे तक्रारीबाबत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करावी तसेच सदर क्षेत्राचे Restoration करणेबाबत समितीने निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | अज्ञात व्यक्ती KMC 17 Mangrove filling malad West | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी तक्रार प्राप्त न झाल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रार पुन्हा जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पाठविण्याबाबत सदस्य सचिवांना सांगितले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक, |
| ३४ | श्री. सुनिल अगरवाल<br>Systematic Destruction of Mangroves opposite D Mart , Malad Link Road , Malad | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी अद्याप स्थळ पहाणी झालेली नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ स्थळ पहाणी व आवश्यक कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक. |
| ३५ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Mangroves near Jaskhar wetlands in Uran | • या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी रायगड यांनी या तक्रारीबाबतचा अहवाल आलेला नाही असे सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>२.सिडको, नवी मुंबई. |
| ३६ | श्री. विनोद पुन्शी<br>Encroachment on mangroves in Sector 33 Mansarovar, Navi Mumbai. | • या तक्रारी संदर्भात समितीने सदर जागेवर restroration करुन घेण्यासाठी वन विभागाकडे जागा हस्तांतरीत करण्यास तहसिलदार पनवेल यांना सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना सदर जागा वन विभागास हस्तांतर करुन वन विभागास सदर जागेवर Restoration चे काम पुर्ण करण्यास सांगितले व ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई.<br>३. वन विभाग |
| ३७ | श्री. नंदकुमार पवार.<br>2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | • या ठिकाणी मोठया प्रमाणात कांदळवनाचा नाश झाल्याने समितीने या तक्रारी संदर्भात JNPT ला सदर जागेवर Restoration करण्यास आणि पाण्याचा प्रवाह योग्य रितीने चालू ठेवण्याच्या सूचना देण्याबाबत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड |
| ३८ | 4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. | • या तक्रारीबाबत समितीने चौकशी करुन FIR दाखल करुन तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी देण्यास जिल्हाधिकारी रायगड यांना सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | | |
| ३९ | 5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | • या तक्रारी संदर्भात उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी सदर जागेवर JNPT मार्फत शेडचे काम चालू असून तेथे कांदळवन व पाणथळ नसल्याचे सांगितले तसेच सदर काम हे कांदळवनापासून ५० मीटर अंतराबाहेर सुरु आहे असे पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीत सांगितले होते.<br>• परंतु या तक्रारीबाबत अद्याप उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्या कडून अहवाल प्राप्त झालेला नाही असे जिल्हाधिकारी रायगड यांनी सांगितले.<br>• उरण परिसरात डंपर्सद्वारे भराव होत असलेच्या तक्रारी मोठया प्रमाणात प्राप्त होत आहेत त्याबाबत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जिल्हाधिकारी रायगड यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करणेचे जिल्हाधिकारी रायगड यांना निर्देश दिले. | जिल्हाधिकारी रायगड |
| ४० | मुंबई उपनगर, मुंबई कांदळवन संरक्षण समितीकडील प्राप्त तक्रारीं संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत. | • शासनाकडील दि.१६ ऑक्टोबर २०१८ चे शासन निर्णयानुसार मुंबई उपनगर, मुंबई कांदळवन संरक्षण समिती बरखास्त झाली आहे. या समितीचे दि.११ ऑक्टोबर २०१८ चे इतिवृत्त विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कडील दि.२३ आक्टोबर २०१८ चे पत्राने सर्व संबंधीत विभागास आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविले आहे. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विषयवार पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत समितीने निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व संबंधीत विभाग |

• सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

अध्यक्ष
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.